## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे मिलिदकुमार सुदाम वाठोरे,वय ५६ वर्ष,व्यवसाय नोकरी, पद–लघुलेखक (स्टेनो), वर्ग३,उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेहकर, जि.बुलडाणा रा तानाजी नगर,मच्छी ले आउट,बुलडाणा |
| लाच मागणी | ७०००/– |
| लाच स्विकारले | ३०००/– |
| घटनास्थळ | उपविभागीय अधिकारी कार्यालय,मेहकर जि.बुलडाणा |
| घटना तारीख | ०३.०९.२०२१ |

**थोडक्यात हकीकत** :– यातील महिला तक्रारदार यांनी त्यांचे ग्राम वेणी शिवारातील त्यांचे नावावर असलेल्या शेता पैकी २० आर शेतजमीन विक्री करण्यासाठी परवानगी देणेबाबत अर्ज उपविभागीय अधिकारी कार्यालय,मेहकर येथे केला होता. सदरचा पारित आदेश तक्रारदार यांना देणेसाठी लोकसेवक वाठोरे यांनी ७०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार नोदविली. दि.०३.०९.२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान पंच क्रमांक ०१ समक्ष महिला तक्रारदार यांना लोकसेवक वाठोरे यांनी ७०००/– रूपये लाचेची मागणी करून तडतोडी अंती ३०००/– लाचेची मागणी करून लाच रक्कम घेवून येण्याचे सांगीतल्या वरून सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.वाठोरे यांनी पंच क्रमांक ०१ यांचे समक्ष उपविभागीय अधिकारी कार्यालय,मेहकर येथील कार्यालयामध्ये ३०००/– रूपये लाचेची रक्कम स्किारताना लोकसेवक श्री.वाठोरे यांना रंगेहात पकडण्यात आले. लोकसेवक वाठोरे यांना ताब्यात घेवून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदर कार्यवाही :–१ .मा.श्री.विशाल गायकवाड,पोलीस अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.अरुण सावंत,अप्पर पोलीस अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा व सापळा पथक पोना विलास साखरे,मोहम्मद रिजवान,पोकॉ विनोद लोखंडे,जगदीश पवार,चालक नापोकॉ नितीन शेटे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांनी केले आहे

**( संजय चौधरी )**
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

Scanned with CamScanner